महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.
मंत्रालय (विस्तार), दालन क्रमांक -५२५, मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्रमांक : ०२२/२२०२ ६५४७ E-mail ID: @nic.in.

क्र.दुविथो-२०२२/प्र.क्र.३१/पदुम-१० दिनांक : २९/३/२०२३

प्रति,
१. आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, वरळी, मुंबई.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी,आरे दुग्ध वसाहत, गोरेगांव, मुंबई.

विषय :- आरे सरीता केंद्र वाटपाबाबत.
संदर्भ :- शासनाचे समक्रमांकचे पत्र दि.२९/७/२०२२ व दि.१६/१२/२०२२

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भाधिन पत्र कृपया पहावे. सदर पत्रान्वये आरे सरिता केंद्र वाट करण्याबाबतची नियमावली तयार करण्यात आली असून दि.८/२/२०२३ व दि.१५/२/२०२३ रोजी आरे आढावा नियतकालिक आढावा बैठकोमध्ये प्र.स.(पदुम) यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने सदर नियमावलीमधील नियम क्र. १५ विधीग्राह्य व्यवसाय व नियम क्र. २६ हस्तांतरण धोरण मधील तरतुद वगळून त्याऐवजी पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत:-

**नियम क्र. १५**

१५. विधीग्राह्य व्यवसाय :- यापूर्वी आरे सरिता केंद्र, आरे एनर्जी केंद्र व इतर शासन मान्य दूध केंद्रांवर केवळ शासनाचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विकण्याचे बंधन होते. परंतु शासनाने कमी झालेले दूध वितरण पाहता केवळ शासनाचे दूध विकण्याचे बंधन असणारी अट कालबाह्य ठरते. यापुढे या केंद्रांवर अन्य सहकारी व व्यवसायिक संस्थाचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विकण्यास परवानगी असेल. तथापि कोणत्याही परिस्थितीत केंद्राच्या आतच सर्व साहित्य ठेवावे लागेल. केंद्राच्या बाहेरील जागेचा वापर करता येणार नाही. तसेच केंद्राच्या

आत गॅस किंवा शेगडी ठेऊन कोणतीही प्रक्रिया करता येणार नाही. तसेच सुट्टे दूध विकता येणार नाही.

ऐवजी

१५. विर्धीग्राह्य व्यवसाय:- यापूर्वी आरे सरिता केंद्र, आरे एनर्जी केंद्र व इतर शासन मान्य दूध केंद्रांवर केवळ शासनाचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विकण्याचे बंधन होते. परंतु शासनाचे दूध वितरण कमी झाल्याने केवळ शासनाचे दूध विकण्याचे बंधन असणारी अट कालबाह्य ठरते. यापुढे या केंद्रांवर अन्य सहकारी व व्यावसायिक संस्थांचे दूध व दुग्धजन्य पदार्थ विकण्यास परवानगी असेल. तथापि कोणत्याही परिस्थितीत केंद्राच्या आतच सर्व साहित्य ठेवावे लागेल. केंद्राच्या बाहेरील जागेचा वापर करता येणार नाही. तसेच केंद्राच्या आत गॅस किंवा शेगडी ठेऊन कोणतीही प्रक्रिया करता येणार नाही. तसेच सुट्टे दूध विकता येणार नाही. आरे केंद्रांवर दूध व दुग्धजन्य पदार्थांव्यतिरिक्त इतर पदार्थांची विक्री करण्यात येऊ नये. ही अट केंद्र चालकास केंद्राचा ताबा देतेवेळी स्टॅम्पपेपर (मुद्रांक) द्वारे मान्य करून घेणे आवश्यक राहील. सदर बाब केंद्र चालकास मान्य नसल्यास त्याने सदर केंद्र शासनास परत करावे.

नियम क्र. २६

२६. हस्तांतरण धोरण - "परवाना अहस्तांतरणीय राहील. तथापि केंद्रचालक मयत झाल्यास अथवा वयाधिक्यामुळे/ वृद्धत्वामुळे परवानाधारक केंद्र चालविण्यास असमर्थ ठरत असल्यास सदर परवाना त्यांच्या कायदेशीर वारसास यांना हस्तांतरण करण्याची बाब अपवाद राहिल. यासाठी ज्या कायदेशीर वारसाच्या नावे परवाना हस्तांतरित करण्यात येणार आहे त्या वारसाशिवाय इतर वारसदारांचे परवाना हस्तांतरणास कोणतीही हरकत नसल्याबाबतचे शपथपत्र १०० रूपयांच्या स्टॅपपेपरवर सादर करणे आवश्यक राहिल."

ऐवजी

२६. हस्तांतरण धोरण - "परवाना अहस्तांतरणीय राहिल". केंद्र चालक मयत झाल्यास अथवा केंद्र चालविण्यास सक्षम नसल्यास सदर केंद्र शासनाच्या ताब्यात घेण्यात येईल. सदर केंद्राचे विहित कार्यपध्दतीनुसार पुर्न:वाटप करण्यात येईल. पुर्न:वाटप करताना मुळ परवानाधारकाच्या वारसास प्राधान्य असणार नाही.

२६.(अ) परवाना नुतनीकरण - आरे सरीता केंद्र हे १० वर्षाच्या कालावधीसाठी चालविण्यास देण्यात यावे. तदनंतर प्रत्येक ५ वर्षांनी परवान्याचे नुतनीकरण करण्यात येईल. नुतनीकरण करताना परवानाधारक केंद्र चालविण्यास सक्षम असणे आवश्यक राहील. केंद्र चालक सक्षम नसल्यास किंवा मयत झाल्यास नुतनीकरण करण्यात येणार नाही. सदर केंद्र शासनजमा करण्यात येईल.

(नि.भा.मराळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत - प्रधान सचिव (पदुम) यांचे स्विय सहायक